# जतन करण्यासाठी आशीर्वाद

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

*‘मंदिरात राहा’ सत्संग*

*शनिवार, १ ऑगस्ट, २०२०*

असे वाटते, जणू एकेकाळी
या जगामध्ये विश्वशांती प्रमुखस्थानी होती
आणि मानवता श्रेष्ठत्वाच्या शिखराला स्पर्श करत होती
कारण बहुसंख्य लोकांनी
शांतीच्या या अलौकिक तत्त्वाकडे लक्ष देण्यास सुरुवात केली होती
आणि नैराश्याने भरलेल्या या जगतामध्ये
एकोपा व प्रशांतता आणण्यासाठी
त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केला होता.

शांतीमध्ये,
सर्व प्राणिमात्रांना
सुरक्षिततेचा
असामान्य अनुभव गवसला.

परंतु, आत्ता,
एक दुसरेच संकट
आपल्या डोक्यांवर घोंघावते आहे,
आपल्या रक्तप्रवाहात झिरपते आहे,
त्यांचे जीवन हिसकावून घेते आहे,
ज्यांना जगण्याचा आणि बहरण्याचा पूर्ण अधिकार आहे.

*संरक्षण* शब्द बहुमोल आहे.
जे लोक या भयानक व्हायरसचा नायनाट करण्यासाठी
आणि या जगात सभ्यता आणण्यासाठी
रात्रंदिवस कार्यरत आहेत,
सुरक्षित असण्याची खोलवर रुजलेली भावना
त्यांना जे देऊ शकते
ते अपरिमित आहे.

पृथ्वी ग्रहावर या महामारीचा प्रकोप होण्याआधीपासूनच
सगळ्यांच्या जीवनांमध्ये,
अनेक अडचणी होत्या,
समस्यांची तर कमतरताच नव्हती.
जो कोणी जगण्यासाठी संघर्ष करत होता,
त्या प्रत्येकाची स्वतःचीच एक अव्यक्त कहाणी होती.

आता हे आधीपेक्षाही अधिक स्पष्ट आहे
की प्रत्येकजण किती वेगळा आहे,
प्रत्येकजण किती हताश आहे,
भिन्न-भिन्न मत-मतांतरांच्या आडव्या-तिडव्या रेषांनी
मानवांमध्ये कसा हाहाकार माजवला आहे.

शतकानुशतके, अनेक लोकांनी—
त्यांचा विश्वास, त्यांची श्रद्धा आणि प्रार्थना यांच्याद्वारे,
त्यांच्या धारणा आणि धर्मविद्या यांच्याद्वारे,
त्यांची नास्तिकता किंवा टीका करण्याची त्यांची मानसिकता यांच्याद्वारे—
उत्तरदायित्वाने, सन्मानाने आणि समग्रतेने
जगण्याचा मार्ग शोधला.
या जगात
जीवन आणि मृत्यूच्या,

अनिश्चिततेच्या,

भीषण संकटाच्या या काळात

आपण कशा प्रकारचे संरक्षण शोधत आहोत आणि देत आहोत?

उच्च विचार करा. छोटी-छोटी पावले उचला.

कळकळीने प्रार्थना करा. सद्गुणी बनण्याचा प्रयत्न करा.

भयभीत होऊ नका. पोषक प्रकाशाला ओळखा.

देण्याखातर द्या. तुमचा दयाळूपणा पसरू द्या.

चिडचिड करू नका. जितका दीर्घ श्वास घेता येईल, घ्या.

पुढे या.

स्वतःला सौजन्याने आणि विनम्रतेने प्रस्तुत करा.

स्वतःची नकारात्मकता सोडून द्या.

सुंदर आणि कल्याणकारी विचार बाळगा

आणि त्यांना कृतीत उतरवा.

अनोख्या रीतीने प्रेम करा.

कोणालाही याबाबत संदेह वाटू नये

की तुम्ही एक सच्चा मनुष्य आहात.

तुमचा आनंद व्यक्त करा.

सर्वांना हे कळू द्या की, तुमच्यावर विश्वास ठेवला जाऊ शकतो.

मधुर आशेला तुमचा प्रतिष्ठित पुरस्कार बनवा.

तुम्ही खरोखर कोण आहात हे प्रकाशात आणण्यासाठी,
हा तुमचा स्वतःचा समय आहे असे समजा
आणि या जगात एक उल्लेखनीय परिवर्तन घडवून आणा.

एक फूल कालांतराने कोमेजून जाऊ शकते.
तथापि, सदैव लक्षात ठेवा :
तुम्ही हिऱ्याने बनला आहात.

© २०२० एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.